advt13

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयुएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी विद्यापीठातील पदवी प्रवेश २०१३-१४

(सविस्तर माहितीसाठी कृपया **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** पहा)

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

सर्व अभ्यासक्रमांचे माध्यम इंग्रजी भाषा राहील.

**उपलब्ध अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता-**

| | अभ्यासक्रम | पात्रता |
|---|---|---|
| १)<br>२)<br>३)<br>४)<br>५) | बी.एस्सी.(कृषी)<br>बी.एस्सी.(उद्यानविद्या)<br>बी.एस्सी. (वनशास्त्र)<br>बी.एफ्.एस्सी.<br>बी. एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) | इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार किंवा समकक्ष परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि इंग्रजीसह) (ज्या उमेदवारांनी गणित विषय घेतलेला नसेल त्यांना संबंधित विद्यापीठाने योजलेले डेफिशियन्सी कोर्सेस पूर्ण करावे लागतील.) |
| ६) | बी. टेक्. (अन्नतंत्र) | इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार किंवा समकक्ष परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि इंग्रजीसह) |
| ७) | बी.बी.ए. (कृषी) | इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार किंवा समकक्ष परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि इंग्रजीसह) ज्या उमेदवारांनी जीवशास्त्र किंवा गणित विषय घेतलेला नसेल, त्यांना संबंधित विद्यापीठाने योजलेले डेफिशियन्सी कोर्सेस पूर्ण करावे लागतील. |
| ८) | बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) | इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण (महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार किंवा समकक्ष परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि इंग्रजीसह) |
| ९) | बी. एस्सी. (गृहविज्ञान) | इयत्ता १२ वी उत्तीर्ण (महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार किंवा समकक्ष कला/वाणिज्य/विज्ञान शाखा परीक्षा इंग्रजीसह) |

जम्मू आणि काश्मीर राज्यातील स्थलांतरित नागरिकांच्या मुलांसाठी तसेच लष्कर आणि निमलष्कर दले, अखिल भारतीय दहशतवादविरोधी सेवेतील कार्यकर्ते व अधिकाऱ्यांच्या मुलांसाठी पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय / अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेशक्षमतेच्या व्यतिरिक्त प्रत्येकी १ जागेची तरतूद आहे.

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** व **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर

दि. ०५ जून,२०१३ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी '**maha-agriadmission.in**' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. २५ जून,२०१३ रोजी किंवा त्यापूर्वी** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा.
- 'ऑन लाईन' भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रत download करून त्यावर उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र चिकटवावे. प्रवेश अर्जावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी आणि प्रवेश अर्जासोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वाक्षांकित (attested) प्रती जोडून कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. यांच्या पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती / बोरीवली (पूर्व) / जळगाव / कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) यापैकी कोणत्याही एका **प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे (ARC)** पोचदेय टपालाने (RPAD) अथवा कुरीयर सेवेमार्फत **दि.०१ जुलै,२०१३ पर्यंत** प्रवेश अर्ज पाठवावा.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. ६००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ३००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

जम्मू आणि काश्मीर राज्यातील स्थलांतरित नागरिकांची मुले, लष्कर आणि निमलष्कर दले, अखिल भारतीय दहशतवादविरोधी सेवेतील कार्यकर्ते, अधिकाऱ्यांच्या मुलांनी ऑनलाईनद्वारे प्रवेश अर्ज दाखल केल्यानंतर 'ऑन लाईन' भरलेल्या प्रवेश अर्जाची download केलेली प्रत व आवश्यक ती सर्व कागदपत्रे मा.मुख्य सचिव, जम्मू व काश्मीर शासन, जम्मू यांच्याकडे **दि. ०५ जुलै,२०१३ पर्यंत** पाठवावीत. मुख्य सचिव कार्यालयाने विस्थापित उमेदवारांचे अर्ज 'कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. यांच्या पुनीत यश आर्केड, चौथा मजला, ऑफीस नं.११, कोथरुड बस स्टॅण्डजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११०३८, महाराष्ट्र' या पत्त्यावर **दि. १० जुलै,२०१३ पर्यंत** पाठवावेत.

**शुल्क प्रदानाची पध्दती-**

भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये चलनाद्वारे / नेट बँकींगद्वारे शुल्क भरण्यात यावे किंवा धनाकर्षाद्वारे शुल्क भरण्यात यावे. धनाकर्ष 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे' यांच्या नावे पुणे येथे देय असावा. सदर धनाकर्ष प्रवेश अर्जासोबत जोडावे. चलनाद्वारे शुल्क भरल्यास चलनाची छायाप्रत प्रवेश अर्जासोबत जोडावी.

टपाल / कुरीयर सेवेच्या विलंबामुळे प्रवेश अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास कृषी परिषद, 'केटीपीएल' अथवा संबंधित कृषी विद्यापीठ जबाबदार राहणार नाहीत.

**अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात न घेता रद्दबातल ठरविण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/२४१३/१०६७

दिनांक- ३१ मे,२०१३

स्वाक्षरीत/-

**महासंचालक,**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

पुणे